


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२७ ●रविवार,दि.१६ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# 'पैसे वाटून निवडणुका होत असतील... आयोगाने विचार करावा'



## बिहार निकालावर शरद पवारांचे गंभीर भाष्य

**मुंबई । प्रतिनिधी**

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने मोठा विजय मिळवला आहे. या निवडणुकीत महाआघाडीला दारुण पराभव पत्करावा लागला असून विरोधकांना ५० जागांचा आकडाही गाठता आलेला नाही.

भाजपने नंबर एकचा पक्ष होऊन विक्रम प्रस्थापित केला असून मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जदयूने जोरदार मुसंडी मारली आहे. बिहारच्या या निकालांनंतर विरोधी पक्षांकडून विविध प्रतिक्रिया आणि आरोप-प्रत्यारोप केले जात असताना, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (NCP) प्रमुख शरद पवार यांनी या निकालावर गंभीर भाष्य केले आहे. या निकालावर भाष्य करताना पैसे वाटून निवडणुका होत असतील तर त्याचा विचार व्हायला हवा असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

बिहारमधील पराभवानंतर विरोधकांनी निवडणूक प्रक्रियेवर आणि मतदारांना प्रभावित करण्यासाठी वापरल्या गेलेल्या योजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे. शरद पवार यांनीही या निवडणुकीआधी राबवल्या गेलेल्या योजनेवरुन सरकारला लक्ष्य केलं.

**● दहा हजार रुपये लहान रक्कम नाही – शरद पवार**

**पुढच्या निवडणुकीत ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी मतदानाच्या आधी अशा पद्धतीने पैशांचे वाटप करून निवडणुकीला सामोरे जायचं अशी भूमिका घेतली तर एकंदरीत निवडणूक पद्धतीबद्दल लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल याची चिंता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशाचे वाटप करणे हे योग्य आहे का याचा विचार निवडणूक आयोगाने केला पाहिजे. निवडणुका स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने व्हाव्यात याच्यामध्ये दुमत असण्याचं कारण नाही. पण दहा दहा हजार रुपये ती लहान रक्कम नाही, असेही पवार यांनी म्हटलं.**

▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ.योगेश क्षीरसागरांचा राष्ट्रवादी बीड विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा

## विकास हाच धर्म, विकास हीच जात म्हणत पदाचा राजीनामा ; स्थानिक स्तरावरील डावलण्याचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) यांच्या बीड विधानसभा अध्यक्षपदी कार्यरत असलेले डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देऊन मोठा राजकीय भूकंप घडवून आणला आहे. स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रियेत जाणूनबुजून डावलले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी आपल्या राजीनाम्यात केला आहे.




डॉ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे की, वेळोवेळी पक्षातील वरिष्ठांकडे तक्रार करूनही परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. अशा परिस्थितीत कार्य करण्यास अडचण येत असल्याने ते पदाचा तसेच प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पक्षाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाबद्दल मी सर्व वरिष्ठ नेत्यांचा मन:पूर्वक आभारी आहे. मी माझ्या पदावरून पक्षाची विचारधारा तळागाळात पोहोचवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. परंतु विकासासाठी काम करताना डावलल्या जाण्याची वेदना सहन करणे ▶ उर्वरित पान २ वर

# 'स्कीम' मधून जादा परतावा तर सोडा बीडच्या विमा प्रतिनिधीने गुंतवलेले 21 लाख ही गेले

**बीड । प्रतिनिधी**

एका गुंतवणुकीच्या स्किममध्ये जादा परताव्याचे आमिष दाखवून बीड शहरातील एका विमा प्रतिनिधीची तब्बल २१ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बीड शहर पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अण्णासाहेब राठोड (रा. बंगाली पिंपळा, माळीवेस, बीड) असे फसवणूक झालेल्या विमा प्रतिनिधीचे नाव आहे. राठोड यांची ओळख कुणाल भाऊसाहेब चव्हाण (रा. चासनळी, जि. अहिल्यानगर; सध्या रा. पुणे) या व्यक्तीसोबत झाली होती. कुणाल चव्हाण



याने अण्णासाहेब राठोड यांना एका विशिष्ट स्किममध्ये पैसे गुंतवल्यास जादा परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. तसेच, विमानाचे तिकीट काढून देण्याचेही सांगितले. कुणालच्या बोलण्यावर विश्वास ठेवून राठोड यांनी २७ डिसेंबर २०२४ पासून त्याच्याकडे गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. ४ जून २०२५ पर्यंत राठोड यांनी कुणालकडे एकूण २१ लाख ३० हजार रुपयांची गुंतवणूक केली होती.

मात्र, नंतर कुणाल याने सांगितल्याप्रमाणे कोणताही परतावा दिला नाही आणि मुद्दल रक्कमही परत केली नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अण्णासाहेब राठोड यांनी बीड शहर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला असून, या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. अशा फसवणाऱ्या आमिषांपासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# अंबाजोगाईतील सक्रीय तरुणांचा मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षात प्रवेश

## नंदकिशोर मुंदडा यांच्यासह सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्क्याने निवडून आणण्याचा केला निर्धार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नगर पालिका निवडणुकीच्या तोंडावर ज्येष्ठ नेते तथा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांच्या नेतृत्वावर वाढत असलेला तरुणांचा विश्वास पुन्हा अधोरेखित झाला आहे. शहरातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय असलेल्या तरुणांनी मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षात प्रवेश करून त्यांच्या प्रचाराला निर्णायक वेग दिला आहे. निवडणुकीत विकास,




पारदर्शकता आणि प्रतिसादक्षम नेतृत्व यांना प्राधान्य देणाऱ्या तरुणांनी नंदकिशोर मुंदडा यांच्या नेतृत्वाखालील टीमला संपूर्ण पाठींबा जाहीर केला आहे.

शहरातील युवा कार्यकर्ते आर्यन मांदळे यांनी आपल्या मित्रपरिवारासह भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी आमदार नमिता मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा आणि पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. ▶ उर्वरित पान २ वर

# दिवंगत विनायक मेटे यांच्या निधनानंतर शिवसंग्रामची पहिली न.प. निवडणुकीत एंट्री

**बीड । प्रतिनिधी**

दिवंगत विनायक मेटे यांच्या निधनानंतर येणाऱ्या प्रथम नगरपालिका निवडणुकीत शिवसंग्राम संघटनेची थेट एन्ट्री होणार आहे. शिवसंग्रामने बीड नगरपरिषदेसह अंबाजोगाई आणि परळी नगरपालिके तही निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. महायुतीच्या माध्यमातून सामील होण्याची तयारी दर्शविताना, समविचारी पक्षांकडे शिवसंग्रामने हात पुढे केल्याची माहिती ज्योती मेटे यांनी दिली.



भाजप व राष्ट्रवादी यांच्यासोबत युती साधली तर महायुतीच्याच उमेदवारांच्या माध्यमातून निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, चर्चेला सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास शिवसंग्राम स्वबळावर सर्वच ठिकाणी उमेदवार उभे करण्यास सज्ज असल्याचेही ज्योती मेटे यांनी ठामपणे सांगितले. दरम्यान, मेटे यांच्या निधनानंतर पहिल्या निवडणुकीत संघटनेच्या ▶ उर्वरित पान २ वर

# ग्रामपंचायत कार्यालयात तोडफोड

## महत्वाचे दस्तऐवज पेटवून दिल्याने खळबळ!



**● सरपंचाकडून आर्थिक पिळवणूक– येथील सरपंच हे वैयक्तिक कामासाठी व घरकुलाच्या हप्त्यापोटी पैशाची मागणी केल्याशिवाय हप्ता देत नाहीत. त्याच्याकडून सातत्याने मनमानी कारभार सुरू आहे. तसेच गेल्या तीन वर्षापासून ग्रामसभा न झाल्यामुळे, आपली व्यथा मांडायची कोणापुढे या भावनेतून कदाचित एखाद्या ग्रामस्थांनी हे गुन्हेगारी घटना घडली असावी, असे समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी सांगितले.**

**कडा । प्रतिनिधी**

अज्ञात व्यक्तीने दारूच्या नशेत शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप तोडून आत प्रवेश करत महत्त्वाचे दस्तऐवज पेटून दिल्याची खळखबळ घटना सुलेमान देवळा येथे उघडकीस आली आहे. आगीत ४० ते ५० रजिस्टर व महत्वाचे दस्तऐवज,फाइल जळून खाक झाले आहेत. कोणी व कोणत्या ▶ उर्वरित पान २ वर

# शिवसेना सज्ज ; निरीक्षक मनोज शिंदे यांच्या उपस्थितीत इच्छुक उमेदवारांची निर्णायक बैठक संपन्न



## शिवसेनेशी प्रामाणिक राहून लढा ; निरीक्षक मनोज शिंदे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड नगर पालिका निवडणुकीच्या रणांगणात शिवसेनेच्या सक्षम उमेदवारांचा फौजफाटा उभा केला आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशावरून काल दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बीडमध्ये निरीक्षक मनोजजी शिंदे लोकसभा संपर्कप्रमुख ठाणे, बापूसाहेब मोरे बीड जिल्हा संपर्काप्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत इच्छुक उमेदवारांची निर्णायक बैठक पार पडली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना जिल्हाप्रमुख ▶ उर्वरित पान २ वर

# धर्मादाय आयुक्तांच्या कार्यशैलीविरोधात मराठा फाउंडेशनचा मुख्यमंत्रींकडे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

धर्मादाय आयुक्त कार्यालयातील कार्यालयातील कामकाजात होत असलेल्या गंभीर अनियमितता, पक्षपाती वर्तन आणि आर्थिक देणग्यांच्या



व्यवहारात पारदर्शकतेचा अभाव याविरोधात मराठा फाउंडेशनने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड. बापूसाहेब विठ्ठलराव जाधव यांनी दिलेल्या निवेदनात बीडचे उपआयुक्त प्रवीण चौधरी यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करत तत्काळ बदली करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, धर्मादाय उपआयुक्त कार्यालयात अर्जदारांना ▶ उर्वरित पान २ वर

# परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत बीड पोलीसांचा चमकदार विजय 58 पदकांची लयलूट

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथे ११ ते १४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान झालेल्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत बीड जिल्हा पोलीस दलाने ऐतिहासिक कामगिरी करत ५८ पदकांची कमाई केली. पुरुष आणि महिला गटात उत्कृष्ट प्रदर्शन करीत बीड पोलिसांनी जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला. यंदा पुरुष गटाबरोबरच महिला गटातही बीडने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धे दरम्यान पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंना थेट प्रोत्साहन दिले. त्यांच्या भेटीमुळे दोन्ही संघांचे मनोबल अधिक उंचावले.

पुरुष गटात थ्रिलिंग प्रदर्शन करत ३६ प्रकारांत पदकवृष्टी झाली. त्यात थाळीफेक, गोळाफेक, धावणे, कुस्ती, जूडो, तायक्वांदो, पॉवरलिफ्टिंग, जलतरण,



फुटबॉल, बॉक्सिंग, व्हॉलीबॉल, हँडबॉल, खो-खो, बास्केटबॉल आदी स्पर्धांमध्ये बीडच्या खेळाडूंनी आपले वर्चस्व सिद्ध केले. महत्त्वाचे म्हणजे, विविध संघीय खेळांतही बीडची समन्वयक कामगिरी ठळकपणे दिसून आली. महिला गटातही पहिल्यांदाच पाठवलेल्या कबड्डी संघाने कडवी झुंज देत उल्लेखनीय यश मिळवले. महिला गटात पॉवरलिफ्टिंग, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, जूडो आणि खो-खोमध्ये दमदार कामगिरी करत अनेक सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके मिळवण्यात आली.

स्पर्धेतील सर्वोत्तम महिला ॲथलिट हा सन्मान बीड जिल्हा पोलीस दलाच्या शीतल नाहोरकर यांनी पटकावला. त्यांना ॲक्टिवा दुचाकी हा विशेष पारितोषिक म्हणून देण्यात आला. या सर्व यशाबद्दल पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी विजेते तसेच सहभागी खेळाडूंना अभिनंदन करून भविष्यात अधिक उंच यश मिळवण्याच्या ▶ उर्वरित पान २



# स्वत: ची Powre Of Compounding ओळखता आली पाहिजे



Powre Of Compounding वरवर पाहता हा शब्द संच आपल्या आर्थिक गुंतवणुकीसाठी फार जवळचा वाटतो.पण थोडं विचार केलं तर लक्षात येईल की आपण जे गुंतवतो ते अनेक पटीने वृद्धिंगत होऊन आपल्याकडे येते.म्हणजे थोडक्यात काय तर तुम्ही सकारात्मक विचारांची गुंतवणुक केली तर ते अल्पावधीत मोठ्या प्रमाणात आपल्यात रुजलेले दिसतील. याठिकाणी मी माझं स्वतःच एक उदाहरण देईन,नोकरीच्या पहिल्या दिवशी आम्ही सर्वजण पंचायत समितीच्या हॉल मध्ये बसलो होतो,प्रत्येकाला चिंता होती की आपल्याला कोणती शाळा मिळेल.जो तो चिंताग्रस्त होता,त्यात एक गोष्ट होती ती अशी की इथे आम्ही चार ते पाच जण सोडले तर इतरांचे कोणी ना कोणी या कोकण पट्ट्यात नोकरी करत होता त्यामुळे त्यांना नोकरीतील नवीन पडस्थापना व इतर बाबींची माहिती होती वा मार्गदर्शन मिळत होते.मला त्यातले काहीच माहीत नव्हते आणि गाव,शाळा यावर व जाण्यायेण्याबाबत दुर्गम,सुगम डोंगरी,खोंडा असे काहीच ध्यानीमनी नाही.डोंगरदऱ्या त सकाळपासून रात्रीपर्यंत पोटासाठी राबणाऱ्या आई वडिलांच्या पोटी जन्मलेलो मी अशा कोणत्याही गोष्टीचा माझ्यावर परिणाम होणार नव्हता.गटविकास अधिकारी मा.चव्हाण साहेबांनी सर्वांना एक एक करून विचारत होते शाळा पाहिल्या का,कोणते गाव अपेक्षित आहेत? मला विचारलं तर मी तडक म्हणालो कोणतेही चालेल फक्त हजर करून घ्या.साहेब परत मला म्हणाले विचार करून सांग इकडे गावे खूप दुर्गम आहेत. परत बदली लवकर होईलच याची खात्री नाही.मी काहीही न बोलता बेफिकीर बाहेर आलो.तोपर्यंत खालापूर त्यालुक्यातील शिक्षकांचे आधारस्तंभ मा.अ.झी.ठाकूर गुरुजी सर्व शिक्षण सेवकांसोबत संवाद साधत होते.त्यांनी सर्वांना उद्देशून एक प्रश्न विचारला तो असा होता, 'मी,अ.झी.ठाकूर खालापूर शिक्षक संघटना अध्यक्ष माझे गाव थोडे म्हणजे जॅम दूर आणि दुर्गम अवघड आहे,पण जो शिक्षक येईल त्याला सांभाळण्याची व सुरक्षेची जबाबदारी आपली.सांगा आताच्या आता ऑर्डर घेऊन सोबत जाऊ.सगळे शांत व चिंतागग्रस्त पुन्हा, मी मात्र ताडकन हात वर केला मी येतो सर आपल्या गावच्या शाळेत. सगळे अचंभीत होते.वेडा आहे का कुठे असेल माहीत नाही,लोकं कशी असतील जाऊदे एक अवघड शाळा कमी झाली.मी अजूनही निश्चिंत व बेफिकीर होतो.सायंकाळी सर्वांना आदेश मिळाले,आम्ही वाचत वाचत विश्रामगृह कडे आलो.तिथे आल्यानंतर बरेचजण बॅग घेऊन निघाले,मी मात्र तिथेच उभा गाव तर माहीत नाही कुठे जायचे,कसे जायचे काहीच माहीत नाही.मी माझा आदेश घेतला व विश्रामगृह च्या व्यवस्थापकाला विचारलं,त्यांनी एकदम जोरात ओरडत सांगितलं लय भारी सर सगळ्यांपेक्षा भारी शाळा मिळाली तुम्हाला अगदी रस्त्यावर ...! एवढं ऐकल्यावर सर्वांनी मला गराडा केला.मला विचारलं तुला भीती वाटली नाही का,मी त्यावर शांतपणे म्हणालो,"मित्रांनो,घरापासून हजारो किलोमीटर दूर आलोय तर इथल्या 10 ते 20 किमीसाठी मी का घाबरू...नोकरी करायला बाहेर पडलोय,आरामशीर आयत्या बाबींवर जगायला नाही हे माझं बोलणं आजही माझे सहकारी मला बोलून दाखवतात.ठाकूर गुरुजी फक्त परीक्षा पाहत होते की कोण आहे हिम्मत करणारा बघुया आणि त्यांनी माझं नाव गटविकास अधिकारी साहेबांना शिफारशीत केलं होतं त्यांच्या हातनोली गावासाठी.आज मी त्या शाळेमुळे सर्वदूर एक उपक्रमशील शिक्षक म्हणून नावलौकिक मिळवलं आणि आजही ती Power of Compound माझ्यासाठी प्रेरणा म्हणून सतत चक्रवाढ व्याजासारखी वाढतच आहे.जेंव्हा जेंव्हा गुरुजींकडे हा विषय निघतो गुरुजी माझ्या धाडसाचं कौतुक करतात. म्हणून आयुष्यात आपल्याला स्वतः ची Powre Of Compounding ओळखता आली पाहिजे...

**– सुभाष राठोड,**
**(लेखक शिक्षक आहेत व बालभारती अभ्यासमंडळ सदस्य आहेत.)**

# जुन्या लग्न पत्रिकांचे विसर्जन करा!

तुळशी विवाह संपन्न झाले कि सर्वत्र लगीन सराई सुरु आहे. सध्या सर्वत्र लग्नसमारंभांचा माहोल आहे. प्रतिदिन कुठे ना कुठे विवाहाची गाणी, बेण्डबाजाचे स्वर ऐकू येत आहेत. विवाह हा जीवनातील अत्यंत महत्वाचा क्षण मानला जातो. तो क्षण अधिक आनंददायी आणि यादगार व्हावा यासाठी प्रत्येक जण आपापल्या ऐपतीनुसार प्रयत्न करत असतो. विवाह निश्चित झाला कि सर्वात प्रथम कृती केली जाते ती म्हणजे पत्रिका छापण्याची आणि कोणाकोणाला निमंत्रण द्यायचे त्याची यादी तयार करण्याची. पत्रिकेसाठी मजकूर तयार करणे, पत्रिकेत नमूद करायची नावे काढणे, पत्रिकेचे नमुने पाहणे या गोष्टी एकामागोमाग सुरु होतात.

कोकणात पूर्वी विवाहाचे निमंत्रण द्यायला जाताना नारळ घेऊन जात असत. घरातील जेष्ठ मंडळींच्या हातात आदराने श्रीफळ देऊन त्यांचा आशीर्वाद घेतला जात असे. घरातील शुभकार्याला कुटुंबातील सर्वांना उपस्थित राहण्याचे तोंडी निमंत्रण दिले जात असे. पुढे प्रिंटेड पत्रिकांचा जमाना आला. कोणाकोणाला पत्रिका द्यायच्या याची यादी तयार करून कोणाला कोणी आणि कधी पत्रिका द्यायला जायचे याचे नियोजन केले जाते. या संपूर्ण निमंत्रण प्रक्रियेसाठी किमान १५ दिवस राखून ठेवावे लागतात. आता तर सोशल मीडियाचा जमाना आहे. सर्वच कार्यक्रमांचे निमंत्रण व्हाट्सअप च्या माध्यमातून एका सेकंदात एका क्लिकमध्ये सर्वांना पाठवले जाते. हल्ली तर पत्रिकेच्या फोटोसह निमंत्रणाचा व्हिडीओ तयार करून तो पोस्ट केला जातो. फेसबुक, ट्विटर आणि इंस्टाग्रामवर पत्रिकेची इमेज अपलोड करून



सर्वांना लग्नाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले जाते. जमाना बदलला असला, निमंत्रण पद्धतीत सोशल मीडियाने अतिक्रमण केले असले, तरी निमंत्रण पत्रिकेचे महत्व अद्याप कमी झालेले नाही हेही खरे. थोड्या का होईना जवळच्या नातेवाईकांना आणि प्रतिष्ठित मंडळींना देण्यासाठी पत्रिका छापल्या जातातच. कुटुंबाच्या ऐपतीनुसार निमंत्रण पत्रिकेचे मूल्य ठरवले जाते. ज्याला बडेजाव दाखवायचा आहे अशी मंडळी एकेका पत्रिकेसाठी १०० ते २०० रुपयेसुद्धा खर्च करतात. अर्थात पत्रिका पाहणारा केवळ लग्नाची तारिख आणि मुहूर्त पाहतो त्यामुळे बाकीच्या शोबाजीला काही अर्थ उरत नाही. सध्या लगीनसराई सुरु असल्याने घरोघरी लग्नाच्या पत्रिका वाटल्या जात आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या घरात पत्रिकांचा खच येऊन पडला आहे.

दरवर्षी विवाहाच्या मोसमात घरी येऊन पडणाऱ्या पत्रिकांचे पुढे करायचे काय हा प्रश्न प्रत्येकालाच पडतो. काहीजण त्या रद्दीत देतात तर काही थेट केराच्या डब्यात टाकतात. हिंदू धर्मात लग्नपत्रीकेवर श्री गणेशाचे चित्र छापण्याची किंवा मुखपृष्ठावर गणेशाचे चित्र असलेली पत्रिका विकत घेण्याची प्रथा आहे. गणपतीचे चित्र असलेल्या अशा पत्रिका केराच्या डब्यात टाकल्याने श्री गणेशाचा अवमान होतो. ज्या गणेशाच्या स्मरणाने आणि पूजनाने आपण कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करतो. ज्या गणेशाला गणेश चतुर्थीच्या काळात मूर्तिरूपाने आपण सन्मानाने घरी आणून त्याची मनोभावे पूजा करतो, ज्याला आपल्या देवघरात अग्रभागी स्थान देतो. त्याच्या कृपेसाठी उपास तापास करतो त्या गणेशाचा अशाप्रकारे होणारा अवमान आपण कधी लक्षातच घेत नाही. रद्दीत दिल्या जाणाऱ्या पत्रिकांचे पुढे काय होते हेही आपणास ठाऊक नसते. देवतेचे नाम अथवा देवतेचे चित्र ज्या ठिकाणी असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप आणि शक्ती कार्यरत असते असे शास्त्र सांगते. त्यामुळे पत्रिकेवरील देवतेच्या चित्राचा सन्मान राखणे आवश्यक आहे. मात्र या पत्रिका साठवून तरी काय करायचे हाही प्रश्न आहेच. अशावेळी पत्रिकेवरील देवतेचे चित्र व्यवस्थित कापून ठेवावे आणि त्या चित्राचे देवघरातील निर्माल्यासोबत वाहत्या पाण्यात विसर्जन करावे, जेणेकरून आपल्या हातून देवतेचा अवमान होणार नाही आणि मनाचेही समाधान होईल. घरी येणाऱ्या श्री सत्यनारायण महापूजेच्या, वास्तुशांतीच्या पत्रिकांचा बाबतीतही आपण वरील प्रमाणे कृती करू शकतो. वर्ष संपत आले आहे, त्यामुळे नवीन कॅलेंडर आपल्या घरी आलेच असेल. जुने कॅलेंडर रद्दीत देताना, त्यांतील देवतांच्या छायाचित्रांची कात्रणे काढून तीसुद्धा निर्माल्यासोबत विसर्जित करूया !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

◆ पान ९ वरून पुढे...

## 'पैसे वाटून...

महाराष्ट्रातहीअशीचप्रकारपैशांचेवाटपझाल्याचेशरदपवारम्हणाले.सत्ताधारी पैसे वाटून निवडणुकीला सामोरे जातील असेही शरद पवार यांनी म्हटलं आहे. या निवडणुकीत काही वेगळा निकाल लागेल असं वाटलं नव्हतं. पण मला अधिकृत माहिती नाही. या निकालाबाबत दोन तीन गोष्टी आहेत. या निवडणुकीत जे मतदान झालं त्याच्याविषयी मी काही लोकांशी बोललो. त्यांनी सांगितलं की या निवडणुकीत मतदान महिलांनी हातात घेतलं होतं. मला एक शंका होती की बिहारच्या महिलांनी इतक्या मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला याचा अर्थ आहे की दहा हजार रुपये देण्याची जी योजना आहे त्याचा हा परिणाम असावा. त्याचवेळी मतदान झालं होतं. महाराष्ट्रात सुद्धा निवडणुकीच्या आधी पैसे वाटले. मताला पैसे येतात तसे नाही. अधिकृतपणे पैसे वाटले गेले. तसंच यावेळी बिहारमध्ये झालेले आहे, असे शरद पवार म्हणाले.

## डॉ.योगेश क्षीरसागरांचा...

कठीण झाले, असे त्यांनी नमूद केले असून, विकास हाच धर्म, विकास हीच जात या घोषवाक्यासह त्यांनी सर्व पदांचा राजीनामा जाहीर केला. डॉ. क्षीरसागर यांच्या या निर्णयामुळे बीडच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अंबाजोगाईतील सक्रीय...

मांदळे यांनी शहरातील समस्यांवर योग्य पद्धतीने काम करणाऱ्या, नागरिकांच्या अडचणींना वेगाने प्रतिसाद देणाऱ्या आणि विकासकामांना गती देणाऱ्या नंदकिशोर मुंदडा यांच्या नेतृत्वावर आपला विश्वास असल्याचे सांगितले. मांदळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काकाजी यांच्यासह सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

◆ पान ९ वरून पुढे...

दरम्यान, अंबाजोगाईतील गौरव कुचेकर यांनीही आपल्या मित्रपरिवारासह भाजपा प्रवेश केला. शहरातील वाढत्या विकासकामांची गती, नव्या प्रकल्पांची अंमलबजावणी आणि नागरिकांना तत्पर मदत करण्याची काकाजींची शैली यामुळे प्रभावित झाल्यामुळे होऊन पक्षात प्रवेश केल्याचे कुचेकर यांनी सांगितले. याशिवाय अंबाजोगाईतील युवा कार्यकर्ते उज्जैन बनसोडे, महेश उर्फ गुड्डू जोगदंड, योगेश माने, गौतम शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीही पक्षात प्रवेश केला. या प्रवेशप्रसंगी काकाजी यांच्या उपस्थितीत नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजप हा विकास आणि जबाबदारीचा पक्ष असल्याने तरुणांना त्यात काम करण्याची संधी झाल्याचे मत तरुणांनी व्यक्त केले. निवडणुकीच्या अगदी तोंडावर तरुणांचा मोठ्या प्रमाणात होत असलेला प्रवेश नंदकिशोर मुंदडा यांच्या प्रचाराला निर्णायक बळ देणारा घटक ठरला आहे. शहरातील बहुतेक प्रभागांमध्ये तरुण मतदारांचे प्रमाण मोठे असून त्यांच्यातील या नव्या उत्साहामुळे प्रचारयंत्रणेला दिशा मिळाली आहे. मुंदडा परिवाराच्या विकास कामांवरील विश्वास, नागरिकांना अडचणीच्या काळात मिळणारा तत्काळ प्रतिसाद, सामाजिक कार्यातील सहभाग आणि २४ तास सर्वांसाठी उपलब्ध असणारे नेतृत्व या गुणांमुळे नंदकिशोर मुंदडा यांना युवा वर्गाचा भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीच्या अगदी जवळ मोठ्या संख्येने तरुण भाजपमध्ये दाखल होत असल्याने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा आणि नगरसेवक पदासाठीच्या सर्व उमेदवारांची बाजू अधिक बळकट झाली आहे.

## दिवंगत विनायक...

रणनीतीबाबत, स्थानिक प्रश्नांबाबत आणि युतीच्या शक्यतांबाबत ज्योती मेटे यांनी सविस्तर भूमिका स्पष्ट केली असून आगामी दिवसांत महायुतीत शिवसंग्रामची अधिकृत भूमिका निश्चित होणार आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## ग्रामपंचायत कार्यालयात...

कारणांसाठी हे कृत्य केले याबाबत अद्याप अधिकृत माहिती कळू शकली नाही. आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील एका दारूने झिंगलेल्या व्यक्तीने शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान हातात कुर्हाड घेऊन ग्रामपंचायतीचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करून महत्त्वाचे दस्तऐवज अस्ताव्यस्त करत पेटवून दिले. ४० ते ५० रजिस्टर व महत्वाचे दस्तऐवज,फाइल जळून खाक झाले आहेत, अशी माहिती गावकऱ्यांनी ग्रामविकास अधिकारी त्र्यंबक मुळीक यांना दिली. दरम्यान, आज ग्रामविकास अधिकारी मुळीक, सरपंच दादा यदु घोडके, अतुल पोपट घोडके, भिमराव सुखदेव भादवे, सचिन भगवान खोरदे, नवनाथ,एकनाथ भोजे या पंचाच्या उपस्थितीत नुकसानीचा पंचनामा करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे ग्रामविकास अधिकारी मुळीक यांनी सांगितले.

## शिवसेना सज्ज...

अनिलदादा जगताप यांनी केले तर निरीक्षक मनोजजी शिंदे लोकसभा संपर्कप्रमुख ठाणे, बापूसाहेब मोरे बीड जिल्हा संपर्काप्रमुख यांनी उमेदवारांना मार्गदर्शन करत मुक्त संवाद साधला. शिवसेनेशी आणि स्वत:शी प्रामाणिक राहून निवडणूक लढवा. अठरा-अठरा तास महाराष्ट्र हितासाठी काम करणारे उपमुख्यमंत्री ना. शिंदे साहेब आपल्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभा आहेत. जिथं गरज पडेल तिथे उभं राहून मदत करणारा आणि सर्वसामान्यांचं हीत पाहणारा आपला नेता आहे. बीड नगर पालिकेवर शिवसनेचा भगवा फडकवा शिवसेना तुमच्या पाठीशी आहे असे निरीक्षक मनोजजी शिंदे लोकसभा संपर्कप्रमुख ठाणे यांनी सांगितले. बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय या मुलाखत सत्रासाठी इच्छुक उमेदवारांची मोठया प्रमाणात गर्दी झाली होती तर याप्रसंगी शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी व्हिजेएनटीसेना, एसटी कामगार सेनेसह सर्व अधिकृत संघटनेचे

◆ पान ९ वरून पुढे...

आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिक उपस्थित होते.

## धर्मादाय आयुक्तांच्या...

योग्य मार्गदर्शन मिळत नसून, फाईली हेतुपुरस्सर अडकविणे, अनावश्यक विलंब करणे, तसेच नागरिकांना आर्थिक देणग्यांच्या मंजुरीसाठी अडचणी निर्माण करणे असे प्रकार सातत्याने घडत आहेत. विशेष कार्यालयातील काही विशिष्ट दलाल मंडळींमार्फत कामे करून घेण्याची सें होत असल्याचेही निवेदनात नमूद आहे. मराठा फाउंडेशनच्या मते, धर्मादाय आयु कार्यालय हे सामान्य जनतेच्या कामासाठी असलेले महत्त्वाचे शासकीय कार्यालय आहे. मात्र, येथेच नागरिकांना त्रास देणे, अफाट विलंब करणे आणि आर्थिक व्यवहारांमध्ये अपारदर्शकता ठेवणे हे लोकशाहीविरोधी आहे. मुख्यमंत्रींकडून तातडीच्या चौकशीची मागणी धर्मादाय उपआयु प्रवीण चौधरी यांची चौकशी करून आवश्यक असल्यास त्यांना पदावरून हटवावे, कामकाजाची संपूर्ण तपासणी करावी, तसेच संबंधितांच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.ॲड. बापूसाहेब जाधव यांनी असेही नमूद केले. की, जनतेला न्याय मिळणे हा शासनाचा मूलभूत अधिकार आहे. कार्यालयातील गैरव्यवहार त्वरित थांबवून लोकांना दिलासा देण्यासाठी त्वरीत कारवाई होणे आवश्यक आहे.

## परिक्षेत्रीय क्रीडा...

शुभेच्छा दिल्या. या मोहिमेचे मार्गदर्शन अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केले. संघ व्यवस्थापनाची जबाबदारी राखीव पोलीस निरीक्षक पांडुरंग दलाई, उपनिरीक्षक बाबर आणि पोअं/अविनाश पांचाळ यांनी पार पाडली. स्पर्धेतील बीड पोलिसांची प्रदर्शित एकजूट, शिस्त आणि क्रीडा कौशल्यामुळे जिल्ह्याचा लौकिक लक्षणीयरीत्या उंचावला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीडच्या माध्यमिक...

माध्यम माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात वेळ काढू पणाचे धोरण अवलंबित जात असून केवळ आणि केवळ पैशासाठी हे पत्र लवकर दिले जात नाही जर मुलांनी पाचशे ते हजार रुपये दिले तर ते संबंधित अधिकारी व कर्मचारी देतात या खाऊगिरीची माहिती माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांना कळताच शिक्षण विभाग कडे गेले होते प्राथमिक शिक्षणा विभागाचे कर्मचारी पैसे घेत नसल्याचे दिसून आले परंतु माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी पैसे घेत असल्याची माहिती त्यांना मिळाली .जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची तात्काळ दखल घेऊन भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे टेकाळे केली आहे.

## परळी वैजनाथ...

यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली, तर इतर दोषी अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी मुख्य अभियंता लातूर अरविंद बुलबुले व अधीक्षक अभियंता बीड प्रेमसिंह रजपूत यांनी पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप होत आहे.

### ● परिपत्रकाचा भंग आणि अधिकारांचा गैरवापर

महावितरणच्या परिपत्रकानुसार, जेव्हा एखाद्या प्रकरणात वर्ग १ ते वर्ग ४ अधिकारी सामील असतात, तेव्हा संपूर्ण कारवाई ही वर्ग १ ते वर्ग ४ या सर्वांचे सक्षम अधिकारी (मुख्य अभियंता लातूर अरविंद बुलबुले ) यांनी करणे अपेक्षित असते. मात्र, नेम चेंज घोटाळा प्रकरणात वर्ग १ ते वर्ग ४ मधील अधिकारी सामील असूनही मुख्य अभियंता लातूर अरविंद बुलबुले यांनी स्वतः कारवाई न करता त्यांचे अधिकार अधीक्षक अभियंता बीड प्रेमसिंह राजपूत यांना वापरू दिले. हे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या निदर्शनास असूनही त्यांनी मौन बाळगले, ही बाब गंभीर मानली जात आहे.

### ● २०१६ प्रमाणे पोलीस कारवाई नाही

२०१६ च्या वीजबिल वसुली घोटाळ्यात कर्मचाऱ्यांवर पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र, २०२५ च्या नेम चेंज घोटाळा प्रकरणात ५ अभियंते दोषी ठरूनही पोलीस कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे महावितरण मधील कर्मचारी संघटना आणि नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. न्यायाच्या नावाखाली कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई, आणि अधिकाऱ्यांना संरक्षण - हा दुहेरी न्याय थांबविण्याची मागणी

◆ पान ४ वरून पुढे...

आता तीव्र झाली आहे. सह व्यवस्थापकीय संचालक प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांनी महावितरण उपविभाग परळी वैजनाथ मधील उघडकिस आलेल्या नेम चेंज घोटाळ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषीं अधिकाऱ्यांवर पोलीसात गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.

## आ. प्रकाश सोळंके...

ताब्यात असतांना शहरात केलेली स्वच्छता, पाणीपुरवठ्यासह विवीध विकासकामांचा पाढा त्यांनी वाचला. त्याचबरोबर आगामी काळात पालिका ताब्यात आल्यास निश्चीतच भुमिगत नाल्या, आठवडी बाजाराच्या जागेचा प्रश्न, नाट्यगृह उभारणीसह अनेक विकासकामे पुर्णत्वाकडे घेवुन जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले. यावेळी कारखाना उपाध्यक्ष जयसिंग सोळंके, नासेर पठाण, सभापती जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, खलील पटेल, कल्याण आबुज, डॉ. वसिम मनसबदार, अच्युत लाटे यांची उपस्थिती होती.

## अखिल भारतीय....

देशमुख यांचे गाव आहे.. त्यांच्या निसर्गरम्य माणिकबागेत ही बैठक होणार आहे.. परिषदेची संपूर्ण टीम बीड जिल्ह्यात प्रथमच येत असल्याने जिल्ह्यातील पत्रकारितेच्या क्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून पदाधिकारी बैठकीस येत आहेत.. खालील मार्गाने त्यांना देवडी येथे पोहोचता येईल. विदर्भातून बैठकीस येणारयांना परभणी, माजलगाव मार्गे देवडीला पोहोचता येईल.. तर मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रातून येणारया साठी बीड येथे निवास व्यवस्था केली जाणार आहे.. बीड ते देवडी हे अंतर ३० किलो मिटर एवढे असून बीड येथून देवडी पर्यत येण्यासाठी वहान व्यवस्था केलेली आहे.. सोलापूर, सांगलीहून येणारे पदाधिकारी उस्मानाबाद, केज, धारूर वडवणी मार्गे देवडीला पोहचू शकतात.. ग्रामीण भागात प्रथमच परिषदेची बैठक होत.. त्यामुळे आगळ्या-वेगळ्या वातावरणात होणारया या बैठकीस सर्व पदाधिकारयांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.. बैठकीत परिषदेच्या भविष्यातील वाटचाल, संघटनात्मक बांधणी, मुंबईतील पुरस्कार वितरण, आदर्श तालुका पुरस्कार वितरण आदिबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहेत.. यावेळी बीड जिल्हयातील पत्रकारितेत मोठे योगदान देणारया काही ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे.. तसेच स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख स्मृती पुरस्काराचे वितरण यावेळी करण्यात येणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होत आहे. या बैठकीस एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, कोषाध्यक्ष मन्सूरभाई यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संभाजीनगरचे

◆ पान ४ वरून पुढे...

विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय संघटन सुभाष चौरे, जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, वडवणी तालुका अध्यक्ष सतीश सोनवणे आणि त्यांची टीम प्रयत्न करीत आहेत.

## राष्ट्रवादीच्या शितलताई...

महिला कार्यकर्त्यांनी प्रचार फेरी काढली. यावेळी गेवराई नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई महेश दाभाडे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकास करण्यासाठी घड्याळाच्या चिन्हावर बटन दाबून मला आशिर्वाद देण्याचे आवाहन केले. यावेळी शितलताई दाभाडे यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. यावेळी मतदार बंधू भगिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला. या प्रचार फेरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर अध्यक्ष पल्लवी गोगुले, किरण दाभाडे, शहर उपाध्यक्ष शीला पैठणे, सचिव अनिता काळे, सरचिटणीस नीता बेद्रे, संगीता घोडके, प्रीती दाभाडे, सीमा होंडे, अनिता खेत्रे, दिपाली मडके, जयश्री दाभाडे, गौरी दाभाडे, मोनिका पंडित, अश्विनी पंडित भावना जैन, किरण दाभाडे, वैष्णवी दाभाडे, आरती गायकवाड योगिता तांबारे, गीता बेद्रे, अनिता काळे, गीता दाभाडे, शोभा औटी, रोहिणी मुळे, शेख रियान, शेख परवीन, नीता डरपे, सुमती पुरणपोळे, वैष्णवी दाभाडे, सोनाली हजारे, अर्चना हजारे, अमृता गायकवाड अलका गायकवाड, सोनाली दाभाडे, सीमा जंवजाळ, त्रिवेणी मुळे यांच्यासह या प्रभागाच्या महिला उमेदवार मंगल आत्माराम हाजारे व उमेदवार श्रीकृष्ण सुमंतराव मुळे सहभागी झाले होते. या प्रचार फेरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते माऊली पंडित, अभिषेक गायकवाड, ज्ञानेश्वर दाभाडे, सोनू दाभाडे, आदित्य दाभाडे रघुनाथ आतकरे, दिनेश मोटे, विशाल ठाकूर, मनोज हजारे, संदीप मुळे, सचिन मुळे, अमोल मुळे, रोहित मुळे, राजू आंबेभुईकर, गोरख शिंदे, संतोष हेटनाळकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## कुर्ला येथे...

कारभारामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. कुर्ला येथील शेतकरी इम्रान पठाण, इरफान पठाण, अयुब पठाण, गाणी पठाण या शेतकऱ्यांच्या आठ एकर उसाच्या पिकाचे नुकसान झाले आहे. महावितरण कंपनीने शेतकऱ्यांचा ऊस जाळून राख झाला आहे. अद्याप कोणताच पंचनामा केलेला नाही. महावितरण कंपनीने तत्काळ शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनाम करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी

◆ पान ४ वरून पुढे...

केली असून प्रश्न मार्गी न लागल्यास शेतकऱ्यांसोबत महावितरण कंपनीच्या कार्यालय समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा ही यावेळी आमटे यांनी दिला.

## भारतीय जनता....

आले होते या ठिकाणी पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ तसेच मराठवाड्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील सर्वच राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील तसेच वकील डॉक्टर इंजिनियर्स पत्रकार सर्व मान्यवर मंडळी यांनी देखील या ठिकाणी येऊन श्री भगवान श्री महारुद्राचे दर्शन घेऊन मा अण्णांना वाढदिवसानिमित्त मनस्वी भरभरून शुभेच्छा दिल्या व सर्व या ठिकाणी उपस्थित असलेले भाविक भक्तांनी अण्णांना उदंड आयुष्य लाभावे अण्णांच्या हातून भविष्यात सातत्याने असेच श्री देव देश व धर्म या साठी सातत्याने कार्य घडत राहावे अशी प्रार्थना ही पेडगाव येथील श्री भगवान महारुद्रच्या चिरडे सर्वांच्या उपस्थितीत करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब तसेच भारतीय जनता पार्टीमध्ये नुकतेच प्रवेश केलेले गेवराई चे माजी आमदार तथा माजी मंत्री मा श्री बदामरावजी आबा पंडित साहेब व सर्जेराव तात्या तांदळे साहेब प्रशांत डोरले अशोक जी लोढा साहेब सलीम जहागीर साहेब तसेच गणेश जी लांडे पाटील सह आदित्य भैय्या सारडा व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने अण्णांच्या वाढदिवसानिमित्त अण्णांना शुभेच्छा देण्यासाठी व महाप्रसाद सेवन करण्यासाठी श्रीक्षेत्र पेडगाव या ठिकाणी उपस्थित होते तसेच लोकशाही पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर साहेब तसेच माजी नगरसेवक बाबुरावजी परळकर साहेब बीड जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी तक्षशिला सोनवणे मॅडम तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाची बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर व मिराताई गांधले सचिन शहागडकर विलास बापू बडगे सखाराम मस्के एडवोकेट जाधव साहेब बाळासाहेब जाधव देविदास नागरगोजे व भाग्यश्री ताई ढाकणे संध्या राजपूत प्रीती कुकडे जा कल्याण व दाजी वाघमारे रामनाथ डाके कंटाळे सर सुरेश शेटे चंद्रसेन मनेरी पाटील रमेश जमदाडे ज्ञानदेव डाके चंद्रकांत मुळे शिवाजी नाईक चंद्रकांत नाईक बाळासाहेब नाईक रामकिसन जगताप किशोर काळकुटे दहिवाळ साहेब जाधव साहेब तावरे साहेब नाटकर साहेब वाघमारे साहेब अर्जुन सह जाधव बीड शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व महायुतीचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच डॉक्टर वकील प्राध्यापक पत्रकार व सर्व पेंडगाव परिसरातील पंचक्रोशीतील सर्व नागरिक सर्व भाविक भक्त मोठ्या हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आदिवासींच्या जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीचे रक्षण करू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## • राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

नागपूर । प्रतिनिधी

राज्य शासन प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टा देत आहे व त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करीत आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासन आदिवासी विकास विभागाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. जनजाती वर्षाच्या निमित्ताने राज्य शासन भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीन व संस्कृतीचे रक्षण करेल, असा विश्वास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव वर्षांतर्गत येथील मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे १५ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.



आज या महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश कुमार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यंदाचे वर्ष 'जनजातीय वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील आदिवासी जननायकांचे चरित्र जनतेसमोर आणण्याचे तसेच त्यांचे स्मारके उभारण्याचा कार्यक्रम दिला आहे. राज्य शासनानेही राज्यातील आदिवासी नायकांचा गौरवशाली इतिहास पुस्तकरूपाने जनतेसमोर आणला आहे. विविध योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्यात येत आहे. राज्यातील आदिवासी आश्रम शाळांचा दर्जा सुधारला आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी 'स्वयम् योजना' राबविण्यात येत आहे. एकही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राणी दुर्गावती सक्षमीकरण योजनेद्वारे दीड लाख आदिवासी महिलांना पन्नास हजार ते दीड लाखांपर्यंत मदत करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात आदिवासी समाजाच्या विकासासाठी 'धरती आबा कार्यक्रम' देशभर राबविण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात 'धरती आबा कार्यक्रम' राबविण्यासाठी १७ मंत्रालयांच्या २५ योजना एकत्र करून ३२ जिल्ह्यातील पाच हजार गावांतील प्रत्येक आदिवासी पाड्यांवर रस्ते, पाणी, वीज, रोजगार आणि महिला विकासाच्या योजना पोहाचविल्या जात आहेत. आश्रमशाळांचे डिजिटायजेशन झाले आहे. ३७ एकलव्य शाळांतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जननायक बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'जनजाती गौरव दिन' साजरा

लिंबागणेश । प्रतिनिधी

क्रांतिकारक, समाजसुधारक, पर्यावरणसंरक्षक आणि आदिवासी समाजाचे शाश्वत प्रेरणस्त्रोत जननायक बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शासन आदेशानुसार १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत 'जनजाती गौरव पंधरवडा' राबविण्यात आला. आज दि. १५ रोजी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून 'जनजाती गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने




शिक्षण, कौशल्य विकास, कला, संस्कृती आणि वारसा या विषयांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शाळेमध्ये वारली चित्रकला स्पर्धा, आदिवासी वेशभूषा स्पर्धा, तसेच आदिवासी नृत्य या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आदिवासी नृत्यात अल्विना अझिम सय्यद, शिवकन्या अंकुश थोरात, रोशनी भारत मुळीक, कार्तिकी शहादेव थोरात, भाग्यश्री बालु थोरात यांनी सहभाग घेतला. आदिवासी वेशभूषेत शिवराज गणेश वायभट, राजवीर महावीर जाधव, शंभू कृष्णा रणखांब, शहानवाज शौकत तांबोळी, सार्थ परमेश्वर रणखांब, तौफीक फिरोज तांबोळी यांनी आकर्षक सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, तसेच पत्रकार हरिओम क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती गिते, श्रीमती अयाचित, श्रीमती सानप यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आदिवासी क्रांतिवीर बिरसा मुंडा जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

एक भारतीय आदिवासी, स्वातंत्र सेनानी आणि आदिवासी जनजातीचे लोक नायक कांतिवीर बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती पिंगळे नगर बीड येथे साजरी करण्यात आली . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड .सुनिल बळवंते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी समाजाचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मधुकर घाणे उपस्थित होते .

अध्यक्षीय भाषणात ॲड. सुनिल बळवंते यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला त्यांनी त्यात म्हणटले



बिरसा मुंडा यांनी गावा गावात उलगुलान नावाची चळवळ उभी केली. या चळवळीतून आदिवासींना एकत्रित करण्याचे काम केले त्यांनी इंग्रजांच्या विरुद्ध आवाज पुकारला इंग्रजांच्या विरुद्ध आवाज देतांनी बिरसा मुंडा म्हणत आमच्या गावात आमचं राज्य पाहिजे, आमच्या देशात आमचं राज्य पाहिजे . इंग्रजांना ठणकावून सांगितले ही जल, जंगल, जमिन आमची आहे. बिरसाने आदिवासीवर अन्याय करणार्या जमिनीदारांची घरे पेटविली. इंग्रजाची पोलिस ठाणे पेटविली. इंग्रजांना सळो की पळो करून सोडले शेवटी इंग्रजांनी बिरसा मुंडा यांना ३ मार्च १९०० रोजी पकडून रांची तुरुंगात ठेवले . तेथेच त्यांचा ९ जुन १९०० रोजी मृत्यू झाला.

या प्रसंगी संजय मोरे, वाल्मिकी गायकवाड, जयेश भुतपल्ले, डॉ रुपेश भुतपल्ले , दिनेश भुतप ल्ले त्रग्वेद चतुर, संग्राम पिंगळे, साक्षी पिंगळे, परदेशी ताई, पिंगळे ताई यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.सुत्रसंचालन डॉ रुपेश भुतपल्ले तर आभार वाल्मिक गायकवाड यांनी मानले

## 'नेक्स्ट इन डिझाईन फ्युचर' युएएफ एक्सपो'चे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या हस्ते उद्घाटन

मुंबई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण युवा पिढीचे भवितव्य घडवणारे आहे. हे शैक्षणिक धोरण अतिशय व्यावहारिक तसेच सर्जनशीलतेस बळ देणारे आणि आधुनिक स्पर्धेत विद्यार्थ्यांना पुढे नेणारे आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे डिझाईन क्षेत्रातील भविष्यातील संधीसाठी उर्मीज आर्ट फोरमतर्फे आयोजित 'नेक्स्ट इन डिझाईन फ्युचर' या युएएफ एक्सपोचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते झाले.

## अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेण्यास मदत केल्याप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड. युवराज शेळके

बीड । प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीच फुस लावून पळवून नेण्यास मदत केल्याबाबत आरोपी नावे संकेत राजेंद्र ढेरे याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातून न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. सविस्तर असे की, अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिनांक १२ /०१/ २०१९ रोजी पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे गु.र. क्र.०१/२०१९ कलम ३६३, ३६६(अ) व ३४ भा. द. वी.नुसार फिर्याद दिली होती की, अल्पवयीन मुलगी ही मौजे ढेकणमोहा येथे तिच्या आजोळी असताना दिनांक ११ /०१



/२०१९ रोजीच्या पहाटे ४:३० वाजण्याच्या सुमारास अल्पवयीन आरोपीने फुस लावून पळवून नेले व पळूवून नेण्यास आरोपी नामे संकेत राजेंद्र ढेरे याने मदत केल्याबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्या अनुषंगाने तपासी अंमलदार पिंपळनेर पोलीस स्टेशन यांनी २८ साक्षीदारांचे जवाब नोंदवून न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले होते, आरोपीच्या विरुद्ध सत्र प्रकरण क्रमांक १४५ /२०२१ नुसार खटला चालवण्यात आला या खटल्यामध्ये साक्षीपुरावा होऊन प्रत्यक्ष दर्शनी साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला.परंतु आरोपीच्या वतीने ॲड.युवराज शेळके यांनी घेतलेल्या बचावाला ग्राहय धरून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब व्ही.एच. पाटवदकर यांनी आरोपीची सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड तालुक्यासह ढेकणमोहा परिसरातील लोकांचे लक्ष लागून होते.

## खेळाडूंनी सांघिक व समर्पित भावनेतून यशस्वी व्हावे : क्रीडामंत्री ॲड.माणिकराव कोकाटे

नाशिक । प्रतिनिधी

शालेय जीवनापासून खेळांची आवड असलेल्या विद्यार्थी खेळाडूंनी आपले नैपुण्य दाखवत यश संपादन केल्यास त्यांना भविष्यात विविध क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे खेळाडूंनी सांघिक व समर्पित भावनेतून पुढे जात यशस्वी व्हावे, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले. विभागीय क्रीडा संकुल येथे आयोजित शालेय राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा सन २०२५-२६ च्या उद्घाटनप्रसंगी क्रीडा मंत्री ड. कोकाटे बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक स्नेहल साळुंखे, उपस्थित होते.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी बिरसा मुंडा यांच्याहस्ते प्रतिमेस पुषपहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी त्यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकताना म्हणाले की, बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंडमधील उलिहातू या गावी १५ नोंव्हेंबर १८७५ रोजी झाला. त्यांचा स्वभाव मिळून मिसळून राहण्याचा त्यामुळे त्यांनी समविचारी सहकार्याचे संघटन केले.त्यांनी अशिक्षित आदिवासींवर इंग्रजाकडून होणारा अन्याय व अत्याचार पाहून त्यांनी इंग्रजाच्या विरूध्दात लढा



उभारला.त्यांना इंग्रजांनी अटक केलीव तुरूंगात त्यांचा अतोनात छळ केला.बिरसा मुंडा यांचा तुरूंगात खटल्या दरम्यान ९ जून १९०० रोजी मृत्यू झाला. तसेच त्यांच्या कार्याबद्दल लोकांनी त्यांना जननायक हा किताब बहाल केला.बिरसा मुंडा यांच्या नावावर विमानतळ रांची, संस्था, विद्यापीठ आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कर्मचारी प्रतिनिधी यांनी केले. तर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, डॉ.नारायण काकडे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस. खान तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते.

## १४ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान मधुमेह रुग्णांची लघवी व रक्त तपासणी मोफत

बीड । प्रतिनिधी

आनंद ऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे गेल्या कित्येक वर्षांपासून 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर रुग्णसेवा करण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १४ नोव्हें बर - जागतिक मधुमेह दिन व्यापकपणे साजरा करण्यात येतो. जगभरामध्ये शंभर कोटींहून अधिक लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत. ही गंभीर सामाजिक जाणीव लक्षात घेऊन आनंद ऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे मोफत मधुमेह तपासणी उपक्रम राबविण्यात आला आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मधुमेह रुग्णांसाठी व ज्यांना मधुमेहाची लक्षणे जाणवत आहेत अशांसाठी खालील तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार




आहेत: रक्तातील जेवणाअगोदरची साखर

- जेवणानंतरची साखर
- रँडम शुगर तपासणी

अलीकडच्या काळात मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने वेळेवर तपासणी व जीवनशैलीतील बदल केल्यास आजार नियंत्रणात राहू शकतो. अनेक रुग्णांकडून या गोष्टींकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे सामाजिक भान म्हणून हा उपक्रम बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी विशेष राबविण्यात येत आहे. तपासणीसोबत मोफत वैद्यकीय मार्गदर्शन देखील करण्यात येणार असून बीडमधील सुप्रसिद्ध डॉ. राजेश पारिख मार्गदर्शन करणार आहेत. तपासणीची वेळ : दररोज सकाळी ७ ते संध्याकाळी ७ हा उपक्रम आनंद ऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला सुरू आहे. या स्तुत्य उपक्रमाचा लाभ बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी जास्तीत जास्त घ्यावा, असे आवाहन सकल जैन समाज, बीड व जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## के.एस.पी.विद्यालय येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती व बालदीन उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

के.एस.पी. विद्यालय, बीड येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती व बालदीन साजरा करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. पंडित जवाहरला नेहरु यांच्या कार्याविषयी मुलांना अवगत करण्यात आले. मुलांना शाळेमध्ये गुलाब पुष्प व खाऊ वाटप करण्यात आला. मुलांनी नाटय, नृत्य, भाष, विविध कला गुण सादर करुन बालदीन सादर केला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सौ.अंजलीताई शेळके , प्रमुख उपस्थिती ऋषिकेशजी शेळके जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग



प्रमुख तसेच तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.

## बाल कलावंताच्या कलागुणांना वाव देण्यासाठी बालरंगभूमी अविरतपणे काम करत आहे : डॉ.दीपा क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित जल्लोष लोककलेचा या लोककला गायन,वादन,नृत्य महोत्साचे आयोजन बीड शाखेच्या वतीने सौ.केएसके महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून श्री.दिलीप खंडेराय, संजयजी जाधव,राजू सोनवणे,केदार देशमुख,स्नेहलताई पाठक, उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

मा.श्रीमती आर. एम. सातव, तदर्थ जिल्हा न्यायाधीश- ३, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क. : ३९४/२०२५

अर्जदार- अनुराग राजेश देशपांडे, वय ०६ वर्षे, मार्फत अ.पा.क. राजेश रमेश देशपांडे, रा. चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड, ह.मु. मोहर प्रतीमा, राव कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे

:: विरूध्द ::

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण/ विक्री करण्याची परवानगी मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार परवेज अनुराग राजेश देशापांडे, वय ०६ वर्षे, मार्फत अ.पा.क. राजेश रमेश देशपांडे, रा. चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड ह.मु. मोहर प्रतीमा, राव कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार यांचा मुलगा नामे चि. अनुराग राजेश देशपांडे, वयः ०६ वर्ष मौजे चकलांबा ता. गेवराई, जि. बीड येथील गट क्र १०७३ मधील १हे ३० आर क्षेत्र पैकी पूर्ण पाहा रु.३-२० पैसे जमीन मिळकत ही अज्ञानाची आई श्वेता राजेश देशपांडे हिचे नावावर होती. श्वेता देशपांडे ही मयत झाल्यानंतर तिचे पश्चात अज्ञान अनुराग राजेश पांडे अ.पा.क. वडील राजेश रमेश देशपांडे याचे नावाची नोंद झालेली आहे. सदर संपुर्ण जमीन १हे. ३० आर क्षेत्र पुर्ण पाहा जमीन विक्री करणे आहे. सदर विकी क्षेत्र १३० आर ची चतुरसिमा अगोदर पुर्वेस ओढा, पश्चिमेस ओढा, दक्षिणेस सुधाकर मधुकर यांची जमीन व उत्तरेस कचरु सांगळे यांची जमीन असे आहे जे अज्ञानाचे नावे असलेली क्षेत्रासह सदर मिळकत विक्री करण्याची व अज्ञानाचे पालनकर्ता म्हणुन नेमण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक १५/११ / २०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. प्रकरणातील पुढील तारीख : १५/१२/२०२५

(अर्जदारातर्फे वकिल : ॲड. एम. डी. धांडे)

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी

नेकनूर । प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे उपस्थित



होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे डॉ. कृष्णा जाधव उपस्थित होते याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा .मुजावर एस.टी. यांनी केले व कार्यक्रमाचे आभार एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. रामरुले डी. के. यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कृष्णा जाधव सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या एकूणच भारतीय लोकशाहीतील योगदानावर चर्चा करत हाच दिवस बालदिन म्हणून कशा पद्धतीने साजरा केला जातो व त्यामागचे काय महत्त्व आहे हे प्रतिपादन केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी बाल सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ • पान ४

## बीडच्या माध्यमिक शिक्षण विभागात खाऊगिरी वाढली

• कुणबी नोंद करण्याचे पत्र मिळवण्यासाठी मोजावे लागत आहेत पैसे

• अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करा– माजी गटशिक्षणाधिकारी टेकाळे



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागात मराठा समाजातील मुलांना कुणबी मराठा प्रमाणपत्राच्या आधारे शाळेत प्रवेश निर्गमवर नोंद करण्याच्या प्रत्रासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मोठा त्रास होत असून पाचशे ते एक हजार पर्यंत रक्कम घेतली जात असून या खाऊगिरीची माहिती माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांना होताच त्यांनी चांगलाच संताप व्यक्त केला. हा घडत असलेलाप्रकार अत्यंत गंभीर असून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची दखल घेऊन माध्यमिक विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांनी केली आहे .

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे म्हणून गेली दोन वर्ष वर्षापासून मनोज जरांगे पाटील जीवाची बाजी लावून लढले त्यामुळे पूर्वी कुणबी मराठा नोंदी होत्या त्या सापडविण्याचे महान काम पाटलांनी केले .ओबीसीत समावेश नसल्यामुळे समाजावर शैक्षणिक व नोकरीत मोठ्या प्रमाणावर अन्याय झाला. मुलं हुशार असून सुद्धा ते कुठेच लागले नाही त्यामुळे समाजाची गरिबीची दरी वाढत गेली दोन वर्षापासून मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उपोषणावर उपोषण करत आपल्या जीवाची बाजी लावत राज्यभरातील मराठा समाजातील मुलांचे भविष्य घडवले आहे सरकारने ज्यांच्या नोंदी कुणबी मराठा आहेत त्यांना तपासणी अंती तहसीलदारांच्या मार्फत कुणबी मराठा प्रमाणपत्र दिले हे प्रमाणपत्र शाळेमधील प्रवेश निर्गमवर नोंद घेण्यासाठी मुलांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे जावे लागते तेथे कुणबी मराठा प्रमाणपत्र दिल्यानंतर या पत्राच्या आधारे पत्र देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ▶ उर्वरित पान २ वर

# परळी वैजनाथ महावितरण उपविभागातील घोटाळे थांबण्याचे नाव नाही !

### अधिकारी दोषी असूनही संरक्षण – मुख्य अभियंता लातूर अरविंद बुलबुले व अधीक्षक अभियंता बीड प्रेमसिंह रजपूत यांच्यावर पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप

**परळी वै. । प्रतिनिधी**

महावितरण उपविभाग परळी वैजनाथ येथे २०१६ साली झालेल्या वीजबिल वसुली घोटाळ्याची गाज अजूनही थांबलेली नाही. त्या प्रकरणात चार कर्मचाऱ्यांना कोणताही नैसर्गिक न्याय न देता निलंबित करून त्यांच्याविरुद्ध पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, त्या घोटाळ्यातील अधिकारी मात्र आजपर्यंत सुरक्षित आहेत.

या प्रकरणात २०१६ मधील मुख्य अभियंता लातूर व अधीक्षक अभियंता बीड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घातल्याचे गंभीर आरोप सुरुवातीपासूनच होत आहेत. या प्रकरणाच्या ३ स्वतंत्र चौकश्या झाल्या असून, प्रत्येक चौकशीत अधिकारी देखील दोषी असल्याचे स्पष्ट झाले. त्यावर आधारित सहव्यवस्थापकीय संचालक, महावितरण प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे लेखी आदेश दिले होते. मात्र, मुख्य अभियंता लातूर व अधीक्षक अभियंता बीड प्रेमसिंह रजपूत यांनी हे आदेश दुर्लक्षित करून अधिकाऱ्यांना संरक्षण दिले.

#### •पुन्हा उघडकीस नेम चेंज घोटाळा

मे २०२५ मध्ये परळी उपविभागात पुन्हा नेम चेंज घोटाळा उघडकीस आला. या घोटाळ्यात खाजगी ग्राहकांची वीजबिले नगरपालिकेच्या नावावर करून, ती बिले नगरपालिकेच्या चेकद्वारे भरली गेली, असा गंभीर प्रकार समोर आला आहे.

मुख्य अभियंता लातूर अरविंद बुलबुले यांनी गठीत केलेल्या चौकशी समितीने या प्रकरणात नितीन थिटे कार्यकारी अभियंता वर्ग १, प्रशांत आंबाडकर उप कार्यकारी अभियंता, रत्नदीप कटके सहाय्यक अभियंता, अभिजीत राठोड सहाय्यक अभियंता, एस ए मडावी सहाय्यक अभियंता, वर्ग २ अधिकारी दोषी असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. तरीदेखील, केवळ प्रशांत आंबाडकर व रत्नदीप कटके ▶ उर्वरित पान २ वर

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (AHTU) सोलापूर मधून केली अल्पवयीन पीडितेची सुटका व आरोपी ताब्यात

### PSI पल्लवी जाधव व त्यांच्या AHTU टीमने केली कार्यवाही

**बीड । प्रतिनिधी**

पोस्टे दिंद्रूड गुन्हा रजिस्टर नंबर ०२/२०२४ कलम ३६३, ३७० भादवी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे तपासावर होता. फिर्यादी तसेच आरोपीचे नातेवाईक यांच्या चौकशी दरम्यान त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य सोलापुर जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून दिनांक १३/११/२०२५ रोजी दुपारी - AHTU ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने सोलापूरकडे रवाना झाली. सोलापूर येथे



पोहोचल्यावर रात्रीच्या अंधारात टीम पीडित व आरोपीचा शोध घेत होती, शेवटी सकाळी तीन वाजता पीडित मुलगी व आरोपी हे दोघे केडगाव ता. करमाळा जि. सोलापूर येथे मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन पोस्टे करमाळा येथे हजर केले व टीम बीड कडे रवाना झाली. त्यानंतर -AHTU ची टीम पोस्टे दिंद्रूड येथे आली व सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोस्टे ला हजर केले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली PSI पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## आ. प्रकाश सोळंके यांनी नगराध्यक्षासह नगरसेवकांच्या उमेदवा-या केल्या जाहिर



**• या नावांची केली घोषणा –राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार निरोनिसा खलील आत्तार पटेल हे तर प्रभाग १ मध्ये रेखा सरोदे, मालती पाठक, प्रभाग २ मध्ये रत्नमाला साळवे, शेख इम्रान, प्रभाग ३ मध्ये राज सय्यद नूर, पठाण नाजेद खान, प्रभाग ४ मध्ये नवनाथ गायकवाड, कलावती फरके, प्रभाग ५ मध्ये मनिषा रेदासनी, राहुल लंगडे, प्रभाग ६ लता लाटे, शेख मजीद, प्रभाग ७ मध्ये वैशाली प्रशांत शेटे, विजय शिंदे, प्रभाग ८ मध्ये यास्मिन तांबोळी, शेख तौफिक, प्रभाग ९ मध्ये मोसिन जलील बागवान, सुनीता प्रल्हाद होके, प्रभाग १० मध्ये राधिका घाडगे, दिनकर होके, प्रभाग ११ मध्ये कोमल वारकड, मतीन शेख, प्रभाग १२ मध्ये उषा बनसोडे, सय्यद रफिक अली, प्रभाग १३ मध्ये सुदामती पोळ, रेहान बी शेख यांच्या उमेदवाऱ्या जाहीर झाल्या आहेत.**

**माजलगाव । प्रतिनिधी**

नगरपालिकेची रणधुमाळी सुरू असुन अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवा-या आ. प्रकाश सोळंके यांनी जाहिर करत नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रवादीला साथ आणि समर्थन देतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आ. प्रकाश सोळंके यांनी राष्ट्रवादीच्या नगराध्यक्षपदासाठी नेरोनिसा खलील पटेल आतार यांचेसह तेरा प्रभागातील २६ नगरसेवक पदाच्या उमेदवा-या जाहिर केल्या. दरम्यान यावेळी पालिका ▶ उर्वरित पान २ वर

### अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची बीड जिल्हयातील देवडी येथे त्रैमासिक बैठक

**वडवणी । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची त्रैमासिक बैठक रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्हयातील देवडी येथे परिषदेचे सर्वेसर्वा एस.एम. देशमुख यांच्या *माणिकबागेत* आयोजित करण्यात आली आहे..परिषदेचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, विभागीय सचिव, परिषद प्रतिनिधी, जिल्हा अध्यक्ष, अधिस्विकृती समितीवरील सर्व सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन सरचिटणीस प्राचार्य सुरेश नाईकवाडे आणि डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे. दर तीन महिन्यांला महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात विस्तारित कार्यकारिणीची बैठक घेण्याचा निर्णय अ. भा. मराठी पत्रकार परिषदेने घेतला आहे.. यापुर्वी नांदेड, मुंबई, सिंधुदुर्ग येथे परिषदेच्या बैठका घेण्यात आल्या होत्या.. यावेळेस मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात ही बैठक होत आहे.. बीड जिल्हयातील देवडी हे एस.एम. ▶ उर्वरित पान २ वर

## राष्ट्रवादीच्या शितलताई दाभाडे यांच्या विजयासाठी नारीशक्ती एकवटली

### अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी केले तगडे नियोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई दाभाडे यांच्यासह राष्ट्रवादीचे सर्व उमेदवार निवडून आणण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसची नारीशक्ती एकवटली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई नगरपरिषद निवडणूक प्रचाराचे तगडे नियोजन केले आहे.



शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक ९ मध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेऊन राष्ट्रवादीच्या घड्याळाचा गजर करण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक ९ मध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. बोर्डे गल्ली, पवार गल्ली, धनगर गल्ली, रंगार चौक, दाभाडे गल्ली, राम मंदिर परिसर, मोंढा रोड परिसर या भागामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ▶ उर्वरित पान २ वर

## कुर्ला येथे महावितरण च्या अनागोंदी कारभारामुळे ऊस जाळून खाक : राजेंद्र आमटे

### शेतकऱ्यांना तत्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्या

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुर्ला शिवारात महावितरण कंपनीच्या अनागोंदी कारभार कंटाळा आला असून विद्युत तारा तुटल्यामुळे चार शेतकऱ्यांचा आठ एकर ऊस जाळून खाक झाला. या शेतकऱ्यांच्या या शेतकऱ्यांच्या जळीत उसाचा त्वरित पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख



राजेंद्र आमटे यांनी दिला. शेतकरी अतिवृष्टी मधून सावरतो ना सावरतो तोच महावितरणच्या भोंगळ ▶ उर्वरित पान २ वर

## लक्ष्मी जिनिंग अँड ऑइल मिलला भीषण आग; अग्निशामक दलाच्या धाडसी प्रयत्नाने मोठी दुर्घटना टळली

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळच असलेल्या बहिरवाडी च.ख.ऊउ. परिसरातील लक्ष्मी जिनिंग अँड ऑइल मिल येथे संध्याकाळी ०४.४४ वाजता अचानक भीषण आग लागण्याची घटना घडली.

अचानक लागलेल्या आगीने काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले.परिसरात मोठ्या प्रमाणावर ऑईल व केमिकल्स असल्याने परिस्थिती धोकादायक बनली होती. आगीची तीव्रता अधिकच वाढल्याने याची माहिती बीड अग्निशामक दलाला दिल्यानंतर तात्काळ बीड अग्निशमन दलाचे वाहन कर्मचारी हे घटनास्थळी येऊन आगीवर



नियंत्रण मिळवण्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यासह घटनास्थळी दाखल होऊन आटोक्यात आणली.

अग्निशामक दलाचे वाहन क्रमांक ( चक ०२ ऋक्र ५७३२) तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन अधिकारी किशोर जाधव, लीडिंग फायरमन कृष्णा जंगले आणि फायरमन रमेश आदमाने यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले.

आगीचा फैलाव मोठा असून केमिकल्सचा साठा असल्याने गेवराई नगरपरिषदेचे एक तसेच गेवराई बाजार समितीचे एक अशा आणखी दोन अग्निशमन वाहनांना पाचारण करण्यात आले. सर्व तिन्ही वाहनांच्या मदतीने केलेल्या अथक प्रयत्नांनंतर आग पूर्णतः आटोक्यात आणण्यात यश मिळाले. सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही मोठी दिलासादायक बाब आहे. अग्निशमन दलाच्या वेळीच झालेल्या धाडसी हस्तक्षेपामुळे मोठ्या दुर्घटनेपासून बचाव झाल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भारतीय जनता पार्टीचे नेते मा. नवनाथ शिराळे पाटील यांचा वाढदिवस हजारो भाव भक्तांच्या उपस्थितीत साजरा

• उपस्थित हजारो भाविक भक्तांनी घेतला महाप्रसाद

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्वात प्रसिद्ध असलेले ठिकाण म्हणजे श्रीक्षेत्र पेंडगाव या ठिकाणी सर्व भाविक भक्तांच्या नवसाला पावणारे असे भगवान श्री महारुद्र



देवता आहेत येथे दर शनिवारी या ठिकाणी मराठवाड्यासह महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात म्हणून बीड जिल्ह्यातील सर्वात उत्कृष्ट देवस्थान व सर्वांचे नवसाला पावणारे असे श्रीक्षेत्र पेंडगाव येथील श्री हनुमान महाराज आहेत या ठिकाणी आज बीड जिल्ह्यामध्ये ज्यांचे कार्य अतिशय उत्कृष्ट आहे राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील धार्मिक क्षेत्रातील तसेच देव देश धर्म यासाठी सातत्याने अग्रेसर असलेले सर्वांच्या सुख दुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे सर्वांना वेळोवेळी मदत करणारे असे सर्वांचे लाडके लोकप्रिय सर्वांना अण्णा म्हणून परिचित असलेले भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राज्याचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त आज या ठिकाणी उपस्थित असलेल्या हजारो भाविक भक्तांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या पवित्र मंगलमय वातावरणामध्ये साजरा करण्यात आला माननीय अण्णांच्या हस्ते श्री भगवान महारुद्राचे महापूजा व श्री रुद्राभिषेक देखील श्री ब्रह्मवृंदांच्या पवित्र श्री वेद मंत्राच्या जयघोषात संपन्न झाला यावेळी या ठिकाणचे सर्व मंदिर परिसर तसेच मंदिराच्या बाहेरील परिसर श्री वेद मंत्राच्या पवित्र जय घोषाने दुमदुमून गेला होता तसेच येथे उपस्थित असलेल्या हजारो भाविक भक्तांनी आज महाप्रसादाचे सेवन केले मा श्री नवनाथ जी अण्णांच्या वाढदिवसानिमित्त शिरोळे पाटील यांच्याकडून येथे येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे उत्तम प्रकारे अतिशय कॉलिटीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात ▶ उर्वरित पान २ वर